ePaper
|| वर्ष - 6 । अंक - 260 || UDYAM-MH-26-0158827 ||
# महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com । मंगळवार । दि. 3 जानेवारी 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## "अजित पवारांना पाकिस्तानात पाठवा":नरेंद्र पवार



**आतील पानांत**

- बाळासाहेबांच्या शिवसेनेत 'इनकमिंग' जोरात
- मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या 'लोगो'चे अनावरण
- मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरेंनी भाजपच्या पाठीत खंजीर खुपसला

# आम्ही दुर्लक्षीत, पण प्रवाहात आलो!

## » आमदार लांडगे यांचे कौतूक : सोसायटी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांच्या भावना

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडसह राज्यातील सोसायटीधारकांच्या भेडसावणाऱ्या समस्या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने पहिल्यांदा सभागृहात चर्चेत आणणारे भाजपा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचे शहरातील सोसायटी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी कौतूक केले आहे.**

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात आमदार महेश लांडगे यांनी सोसायटी धारकांच्या समस्यांबाबत लक्षवेधी लावली होती. या लक्षवेधीवर राज्य सरकारकडून सकारात्मक चर्चा झाली. सोसायटीधारक आणि बांधकाम व्यावसायिक यांच्यातील संघर्ष कमी व्हावा. समस्यांचे तात्काळ निराकरण व्हावे. यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. त्यासाठी पुण्यात सर्व संबंधित विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, सोसायटी फेडरेशनचे पदाधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन राज्य सरकारच्या वतीने उद्योगमंत्री उदय समांत यांनी सभागृहात दिले आहे. त्यामुळे सोसायटीधारकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

चिखली- मोशी-पिंपरी-. चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनेचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमधील सदनिकाधारकांच्या हक्कांसाठी आणि होणाऱ्या असुविधांबाबत आम्ही गेल्या सात-आठ वर्षांपासून प्रशासन आणि लोकप्रतिनिधीकडे पाठपुरावा करीत आहोत. आमदार महेश लांडगे यांनी सर्वप्रथम सोसायटीधारकांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. एवढेच नाही, तर नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना मांडून राज्य सरकारचे लक्ष वेधले. राज्यात विधानसभेमध्ये नेतृत्व करणारे 288 आमदार आहेत. पण, सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी धडपडणारे एकमेव आमदार म्हणून महेशदादा लांडगे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. वेळकाढूपणा करणाऱ्या आणि सोसायटी धारकांच्या समस्यांचे केवळ राजकारण करू पाहणाऱ्या नेत्यांच्या डोळ्यात ही अंजन घालणारी बाब आहे.



### समस्या सुटतील असा विश्वास वाटतो : दत्तात्रय देशमुख

पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष दत्तात्रय देशमुख म्हणाले की, सोसायटीधारकांच्या समस्यांबाबत आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. मात्र, आतापर्यंत हा घटक प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या दृष्टीने अक्षरश: दुर्लक्षीत होता. आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून हा प्रश्न राज्य विधिमंडळाच्या सभागृहात चर्चेत आला. त्याला विरोधी पक्षानेही समर्थन दिले. कचरा, पाणी, बांधकाम व्यावसायिकांकडून होणारा त्रास या सर्वच मुद्यांवर आमदार लांडगे यांनी लक्ष वेधले. आगामी काळात सोसायटीधारकांच्या समस्या सुटतील, असा विश्वास वाटतो.

### सोसायटीधारकांकडून आमदार लांडगेंचे आभार

" देहकडून देवाकडे जात असताना मध्ये देश लागतो आणि त्या देशाच्या सेवेसाठी आपण तत्पर राहीले पाहिजे", असा संदेश स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी तमाम भारतीयांना दिला. याच विचाराने काम करणारे आमदार महेश लांडगे यांनी सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी घेतलेला पुढाकार स्वागतार्ह आहे. आतापर्यंत सोसायटीधारकांच्या न्याय मागण्या सरकारकडे मांडण्यासाठी कोणी पुढाकार घेतला नाही. पण, आमदार लांडगे यांनी सर्वच सोसायटीधारकांच्या मागण्या केवळ सरकारकडे मांडल्या नाही, तर त्यावर उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला. त्यामुळे तमाम सोसायटीधारकांच्या वतीने आमदार लांडगे यांचे आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया चिखली-मोशी- पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे उपाध्यक्ष लक्ष्मीकांत बोंडे यांनी दिली.

# नियमित पाणी पुरवठा करा : मनसे

## सचिन चिखले यांचे स्मरणपत्र : महापालिका प्रशासनाकडे मागणी

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखलीतील जलशुद्धीकरण प्रकल्प सुरु करावा. निघोजे बंधा-यातून पाणी उचलावे. मागील तीन वर्षांपासून एकदिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जात असलेल्या शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठा करावा, या मागणीसाठी मनसेने महापालिका मुख्यालयासमोर आंदोलन केले.**

शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनामध्ये महिला शहराध्यक्षा अश्विनी बांगर, महिला शहर सचिव सीमा बेलापूरकर, संगीता देशमुख, विद्या कुलकर्णी, विशाल मानकरी, राजू सावळे, चंद्रकांत दानवले, रुपेश पटेकर, दत्ता देवतरासे, मयूर चिंचवडे, सुशांत साळवी, नितीन सूर्यवंशी, शिवकुमार लोखंडे, तुकाराम शिंदे, अमर माळी, नितीन चव्हाण, राजू भालेराव, राजेश अवसरे, श्रद्धा देशमुख, कैलास दुर्गे, निलेश नेटके, कृष्णा महाजन, सुरेश सकट, विशाल उकिरडे, सोनू भोसले, ॲलेक्स आप्पा मोजेस, नारायण पठारे, शिशिर महाबळेश्वरकर, रोहित काळभोर, मंगेश भालेकर, रोहित थोरात, बाळा शिवशरण, आशिष शेलार, सागर शिंदे, जय सूर्यवंशी, आकाश सागरे सहभागी झाले होते.



### ... अन्यथा कठोर भूमिका घ्यावी लागेल!

**"पिंपरी-चिंचवड शहरात आज जवळपास तीन वर्षांहून अधिक काळ 'दिवसाआड' पाणी पुरवठा सुरु आहे. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी 25 नोव्हेंबर 2019 पासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला. आजतागायत दिवसाआडच पाणीपुरवठा सुरु आहे. (PIMPRI NEWS) प्रशासनाची अडचण समजून शहरातील नागरिकांनी पालिकेस सहकार्य केले. पण, आता नागरिकांचा संयम सुटत आहे. नियमित पाणी देऊन शहरवासीयांना दिलासा द्यावा. तसेच लवकरात-लवकर चिखली पाणीपुरवठा प्रकल्प सुरु करावा. अन्यथा मनसेला पुढील काळात कठोर भूमिका घ्यावी लागेल", असा इशाराही मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी दिला आहे.**

## थोडक्यात

### कोथरूड, शिवाजीनगर परिसराचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद

**पुणे । महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**

शिवाजीनगर येथील कामगार पुतळ्याजवळील पाण्याची मुख्य वितरण नलिका मेट्रोच्या कामामुळे स्थलांतरित करण्याचे काम येत्या गुरुवारी (५ जानेवारी) करण्यात येणार आहे. तसेच चांदणी चौक येथे प्रथमेश सोसायटी लगत कोथरूड भागाला पाणीपुरवठा करणारी सोळा इंच जलवाहिनी दुरुस्तीची कामे गुरुवारी करण्यात येणार आहेत. त्यामुळे कोथरूड आणि शिवाजीनगर भागाचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार आहे. शुक्रवारी म्हणजे दुसऱ्या दिवशी (६ जानेवारी) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून कळविण्यात आले आहे.दरम्यान, बाणेर,औंध भागाचा पाणीपुरवठा उद्या (बुधवार, ४ जानेवारी) बंद राहणार आहे. चतुःशृंगी पाणीपुरवठा विभागाअंतर्गत चतुःशृंगी टाकीच्या मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम बुधवारी करण्यात येणार आहे. शिवाजीनगर, कामगार पुतळा परिसर, जिल्हा सत्र न्यायालय, कपोते गल्ली, सिमला ऑफीस परिसर, नरवीर तानाजी वाडी, पुणे-मुंबई रस्ता, कोथरूड भागातील या भागाचा पाणीपुरठा बंद राहणार आहे..

# मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प 'लोगो'चे अनावरण!

## चंद्रकांत दादाः 'पुणेरी' लोगो, 'पुणेरी काका' 'मॅसकॉट'चे अनावरण

**पुणे । महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**

**शहरातील महत्त्वकांक्षी मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या 'पुणेरी' या (PUNERÉ) या लोगोचे व 'पुणेरी काका' या 'मॅसकॉट'चे आज पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते अनावरण झाले. या प्रकल्पाच्या अनुषंगाने घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांची माहिती देण्यासाठी WWW. PUNERE.IN हे संकेतस्थळ तयार करण्याचे आले आहे, त्याचेही लोकार्पण आज करण्यात आले**



महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्याची मुळा-मुठा नदीसोबत नागरिकांचे एक प्रकारे नाते जोडले गेले आहे. त्यामुळे या दोन्ही नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी महापालिकेने हा प्रकल्प हाती घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाल्यानंतर पहिल्या टप्प्यातील काम सुरू झाले आहे. या प्रकल्पामध्ये राबवण्यात येणारे विविध उपक्रम, स्पर्धांची माहिती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळासह 'पुणेरी' (PUNERÉ) लोगो, 'पुणेरी काका' 'मॅसकॉट'चे अनावरण करण्यात आले.

यावेळी महापालिका आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त डॉ.कुणाल खेमनार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, मुख्य अभियंता श्रीनिवास बोनाला, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष हेमंत रासने आदी यावेळी उपस्थित होते.

मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करणे, पूर येण्याचा धोका कमी करणे, नदीच्या बाजूने सार्वजनिक जागा निर्माण करणे, नदीत पाणी टिकवून ठेवणे, नदीकडे जाण्याचा रस्ता सुधारणे, ऐतिहासिक वास्तू, उद्याने आणि अस्तित्वात असलेल्या जागांचे एकीकरण करणे, हे सहा प्रमुख उद्देश आहेत. प्रकल्पाचा नागरिकांना नेमका काय फायदा होणार आहे, याबाबत माहिती व प्रतिज्ञा पुणे महापालिकेतर्फे नागरिकांना देण्यात येणार आहे. पाणी बचत, पर्यावरण संवर्धन या अनुषंगाने ही प्रतिज्ञा आहे.

### जनजागृतीसाठी स्पर्धा

**मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाबाबत पुणे शहरातील नागरिकांना माहिती मिळावी, प्रकल्पाबाबत असणाऱ्या त्यांच्या शंका दूर व्हाव्यात, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील. हा प्रकल्प असा असणार याची माहिती नागरिकांना देण्यासाठी 'एक्सपीरियंस सेंटर' तयार केले जाणार आहे. रिल्स, फोटोग्राफी, इमोजी, मेमोरीज्, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाणारआहे. हे सर्व उपक्रम 'पुणेरी'च्या या सोशल मीडिया पेजेसच्या माध्यमातून राबवणार आहे. तसेच संकेतस्थळावरही माहिती उपलब्ध असेल.**

# अजित पवार दिलगिरी व्यक्त करत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरू राहील

## ■ छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य ■ पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची प्रतिक्रिया

**। पुणे महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**





विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या विधानानंतर संपूर्ण राज्यभरात राजकारण तापलं आहे. भाजपने राज्यात अजित पवार यांच्याविरोधात निदर्शने केली. बारामतीमध्ये अजित पवार यांचा प्रतिकात्मक पुतळा देखील जाळला गेला. यावर पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. अजित पवार दिलगिरी व्यक्त करत नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन असच सुरू राहील, असं चंद्रकांत पाटील म्हणाले.

भाजपच नाही तर सर्व राष्ट्रीय संघटना ज्यांना राष्ट्र आपलं वाटतं, इतिहास आपला वाटतो यांच्यासह खासदार संभाजीराजे छत्रपतींसह सर्वजण विषयावर व्यक्त झाले आहेत. छत्रपती संभाजीराजे हे धर्मवीर नव्हते, अजित पवार असं कसं काय स्टेटमेंट करू शकतात? जो इतिहास लिहिला आहे तो चुकीचा आहे, असं त्यांना म्हणायचं आहे का? आपलं मत परखडपणे मांडणाऱ्या अजित पवारांकडून हे स्टेटमेंट कसं केलं गेलं हा मलाही आश्चर्याचा धक्काच आहे. अजित पवार जोपर्यंत दिलगिरी व्यक्त करत नाहीत तोपर्यंत हे आंदोलन असंच सुरू राहील, असं चंद्रकांत पाटील म्हणाले.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा हे २० तारखेला शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर येणार असल्याची माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. यामध्ये ते भोसरीला येणार आहेत. सुरवातीला ८ तारखेचा हा दौरा होता. मात्र आज २० तारीख निश्चित झाली आहे. महाराष्ट्रात ज्या लोकसभा मतदारसंघात भाजपचा पराभव झाला आहे किंवा ती जागा सहयोगी पक्षाकडे होती, अशा मतदारसंघात नड्डा दौरा करणार आहेत.बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचे नेते शिवाजीराव आढळराव पाटील यांचा हा पारंपरिक मतदारसंघ आहे. अशात ही जागा भाजप त्यांना सोडणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. कोणती जागा कोणाची, हे अजून ठरलं नाही. तर देशभरातील सर्वच जागा भाजपला लढायच्या आहेत, असं समजून काम करा, असे आदेश भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी दिले आहे. त्यामुळे अध्यक्षांचा दौरा ज्या मतदारसंघात होईल आणि त्या जागा मित्र पक्षांना सोडवण्याची वेळ आल्यास त्यांना देखील या दौऱ्याचा फायदा होईल, असंही चंद्रकांत पाटील म्हणाले.

शहरातल्या वाढत्या गुन्हेगारीवर चंद्रकांत पाटील बोलले. नवीन आलेले पोलीस आयुक्त शहराच्या दृष्टीने कोणता अधिकारी कुठे योग्य राहील याची रचना करणार आहेत. धाडस थोडं वाढला आहे, हे मलाही मान्य आहे. परंतु मागच्या अडीच वर्षात महाविकास आघाडीचे सरकार असताना पोलिसांच्या ज्या बदल्या झाल्या त्या बदल्यांचाही हा काही प्रमाणात परिणाम आहे.

# बाळासाहेबांच्या शिवसेनेत 'इनकमिंग' जोरात

## खासदार बारणेंची दणका : माजी नगरसेवक मलशेट्टी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश

पिंपरी । महाईन्यूज ।

**माजी नगरसेवक प्रकाश मलशेट्टी, उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव कुसाळकर यांच्यासह काळेवाडी, राहटणी परिसरातील 100 हून अधिक कार्यकर्त्यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रवेश केलेल्या या कार्यकर्त्यांचे उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी स्वागत केले.**



खासदार श्रीरंग बारणे यांच्या नेतृत्वाने प्रेरित होऊन आणि जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर यांच्या प्रयत्नातून काळेवाडी, राहटणी परिसरातील 100 पेक्षा अधिक इतर पक्षातील कार्यकर्त्यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला. प्रकाश मलशेट्टी यांनी काळेवाडी परिसराचे महापालिकेत नेतृत्व केले आहे.

या भागात त्यांची चांगली राजकीय ताकद आहे. त्यांनी आता बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला. याप्रसंगी पुणे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख निलेश तरस, शहर संघटक रवींद्र ब्रम्हे, समन्वयक हेमचंद्र जावळे, ॲड. प्रवीणकुमार गायकवाड, उपशहर प्रमुख अंकुश कोळेकर, तुकाराम कांचन, उद्योजक रुपेश यादव, दत्ता मोरे, प्रदीप कुमार, राजकुमार बालाजी, रमेश जाधव, मोतीराम देडे, मनोहर गासड, सुरेश पट्टेवर, गौरव नागणे, संदिपान दाभाडे, सुमित दाभाडे यासह अनेक कार्यकर्त्यांनी खासदार बारणे यांच्या नेतृत्वात बाळासाहेबांच्या शिवसेनेत मोठ्या जल्लोषात फटाके वाजवून घोषणा देत प्रवेश केला.

> "बाळासाहेबांच्या शिवसेनेत कार्यकर्ते मोठ्या संख्येने प्रवेश करत आहेत. आता माजी नगरसेवकही पक्षात येवू लागले आहेत. पक्षाचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्याने प्रेरित होवून कार्यकर्ते पक्षप्रवेश करत आहेत. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आणि भाजपचे नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार जनहिताचे निर्णय घेत आहे. मुख्यमंत्री शिंदे यांची कार्यशैली राज्यातील जनतेला भावली आहे. त्यामुळे बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश करण्यास माजी लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते पसंती देत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात बाळासाहेबांच्या शिवसेनेचे संघटन मजबूत होत आहे. त्याचा आगामी महापालिका निवडणुकीत नक्कीच फायदा होईल".
>
> -श्रीरंग बारणे, उपनेते, खासदार.

# पवार कुटुंबीय इतिहास विसरले, संभाजी राजे धर्मवीरच!

## संकेत चोंधे यांची टीका : अजित पवार यांच्या वक्तव्याचा निषेध

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांनी हिंदू धर्माभिमानासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. हा इतिहास पवार कुटुंबीय विसरले आहेत. महापुरूषांचा अपमान हेच पवारांचे अभियान आहे, अशी टीका भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष संकेत चोंधे यांनी केली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते व राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीर नाहीत, असे वादग्रस्त विधान केले. त्याचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने निगडी येथील भेळ चौकात आंदोलन करण्यात आले.

यावेळी, प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, प्रदेश कार्यकारणी सदस्य अजित कुलथे, प्रदेश युवती सहसंयोजिका वैशाली खाडे, जिल्हा सरचिटणीस दिनेश यादव,दीपक नागरगोजे, जिल्हा उपाध्यक्ष उपाध्यक्ष शिवराज लांडगे, प्रसाद कस्पटे, संदीप नखाते, पंकज शर्मा, सतीश नागरगोजे, प्रशांत बाराथे, युवराज ढोरे, राहुल खाडे, निलेश अष्टेकर, मंगेश घाडगे, मंडल अध्यक्ष सुमित घाटे, सनी बारणे, सागर घोरपडे, केतन पाटील, विद्यार्थी संयोजक दिगंबर गुजर, सहसंयोजक अजय मोरे, साहिल कांबळे, कल्पेश साळवी, सोशल मीडिया संयोजक विक्रांत गंगावणे, संयोजक प्रथमेश सकपाळ, वरद जोशी आदी उपस्थित होते. धर्मासाठी झिजला छावा औरंग्याचा जाणून कावा, महापुरूषांचा अपमान हेच पवारांचे अभियान, अश्या घोषणा देत अजित पवार यांच्या वक्तव्याचा भारतीय जनता पक्षातर्फे निषेध करण्यात आला.

# पिंपरी चिंचवडमधील बेपत्ता वकिलाचा अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

। मुंबई । महाईन्यूज ।



पिंपरी- चिंचवडमधून ३१ डिसेंबरच्या दुपारी बेपत्ता झालेल्या वकिलाचा अर्धवट जळलेला मृतदेह महाराष्ट्र तेलंगणा सीमेवरील मदनुर येथे आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. शिवशंकर शिंदे अस मृत झालेल्या वकिलाचे नाव आहे. त्यांचं काळेवाडी येथे ऑफिस आहे. तिथून ते बेपत्ता झाल्याची तक्रार वाकड पोलीस ठाण्यात दाखल आहे. पोलीस शोध घेत असतानाच त्यांचा अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. ही हत्या आहे का? या बाजूने देखील पिंपरी-चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

३१ डिसेंबर २०२२ रोजी वकील शिवशंकर हे त्यांच्या ऑफिसमधून बेपत्ता झाले होते. याबाबत त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्याशी संपर्क केला मात्र तो होऊ शकला नाही. मग, वाकड पोलिसात जाऊन तक्रार नोंदवण्यासाठी गेले. तिथं, वाकड पोलिसांनी तक्रार नोंदवून घेण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे सांगण्यात येत आहे. अखेर, उशिरा ही शिवशंकर बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवून घेतली. पोलिसांनी तपास देखील सुरू केला. काही तास उलटले नाहीत तोपर्यंत शिवशंकर यांचा अर्धवट जळलेला मृतदेह महाराष्ट्र तेलंगणा सीमेवरील मदनुर येथे आढळला आहे. पिंपरी- चिंचवड पोलीस हे शिवशंकर यांची अपहरण करून हत्या तर झाली नाही? या दिशेने देखील तपास करत आहेत.

### मृत वकिलाच्या कार्यालयात तुटलेले बटन आणि रक्त आढळलं

मृत शिवशंकर यांच्या काळेवाडीतील ऑफिसमध्ये त्यांच्याशी अज्ञात व्यक्तीने झटापट केल्याचा संशय पोलिसांना आहे. तिथं, तुटलेली बटन आणि रक्त आढळलं आहे. यामुळं त्यांचं अपहरण करून तर हत्या केली नाही ना असा संशय पोलिसांना आहे. त्याचा उलगडा करणे पोलिसांसमोर मोठं आव्हान असणार आहे.

## संपादकीय »


# शिक्षणाची शिक्षा!

***सरकारकडून इतके दिवस अमान्य केले जाणारे बेरोजगारीचे सत्य बँकांकडील आकडेवारीने अधोरेखित होते.. शिक्षण व बाजारपेठ यांत इतका विसंवाद कसा?***

पुढील तपशील बँकांच्या बुडत्या कर्जाबाबत असला तरी हा विषय नेहमीचा नाही. तो नेहमीच्या बुडत्या कर्जापेक्षा अधिक हृदयद्रावक आहे. वस्तुत: भारतीय बँकांना कर्जे बुडणे नवीन नाही. त्यातही सरकारी बँकांना तर नाहीच नाही. सरकारी बँका जणू कर्जे बुडवण्यासाठीच जन्माला आलेल्या असतात किंवा काय असा प्रश्न त्यांच्या ताळेबंदांवरून पडतो. खासगी उद्योजक एरवी त्यांच्या आयुष्यात बडय़ा, चकचकीत कर्मचारी असलेल्या खासगी बँकांद्वारे आपले व्यवहार करीत असतात. खासगी बँकाही आपले हे तसेच चकचकीत ग्राहक मिरवीत असतात. पण या उद्योजकांस व्यवसायवाढीसाठी जेव्हा भांडवलाची गरज लागते तेव्हा मात्र त्यांचे प्राधान्य कंटाळवाण्या वातावरणातल्या सरकारी बँकांना असते. म्हणजे कर्जे घ्यायची सरकारी बँकांकडून पण त्याद्वारे आलेली संपत्ती मिरवायची खासगी बँकांत असा हा दुटप्पीपणा. असो. त्याविषयी याआधी लिहिले गेले आहे आणि पुन्हाही तसे काही लिहिण्याची संधी मिळेल. पण येथे विषय या अशा उद्योगांस सरकारी बँकांतून होणाऱ्या पतपुरवठय़ाचा नाही. तो आहे सरकारी बँकाच प्राधान्याने ज्यास कर्जे देतात त्या क्षेत्राचा आहे. हे क्षेत्र म्हणजे शिक्षण. गेल्या काही वर्षांत शिक्षणासाठी कर्जपुरवठा करण्याच्या उद्योगास चांगले दिवस आले. उच्च शिक्षणासाठीचे शुल्क, परदेशी विद्यापीठांतील शिक्षण आदी अनेक कारणांसाठी अशा माध्यमातून कर्जे देण्याचे प्रमाण वाढले. आपली सांस्कृतिक परंपरा अशी की त्यातल्या त्यात सधन नातेवाईकांकडे शिक्षणासाठी हात पसरायचे आणि नंतर हे कर्ज 'जमेल तसे' फेडायचे. पण बँकांनीच शिक्षणासाठी रीतसर कर्जे देण्यास सुरुवात केल्याने हे आप्तेष्टांकडे हात पसरणे कमी झाले. तथापि ही बँकांची शैक्षणिक कर्जेच नेमकी संकटात आल्याचे दिसते. भारतीय समाजासाठी शिक्षणाचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता हा विषय गंभीर ठरतो. त्याची दखल घ्यायला हवी. बुडीत खात्यात निघण्याच्या प्रमाणात गेल्या काही वर्षांत भयावह वाढ झाली असून चिंतेची बाब अशी की, या कर्ज रकमाही फार मोठ्या नाहीत. देशातील १२ सरकारी बँकांतून प्राधान्याने आणि अग्रक्रमाने शैक्षणिक कर्जे दिली गेली. त्यातही स्टेट बँक, कॅनरा बँक, युनियन बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँक

# ही समृद्धी सर्वदूर कधी जाणार?



मुंबई ते नागपूर या समृद्धी महामार्गाचा पहिला टप्पा सुरू झाला. काही काळाने तो पुरा होईल. मात्र, संपूर्ण महाराष्ट्रातील रस्त्यांचे जाळे हे असे कार्यक्षम बनेल तेव्हाच विकासाची गंगा शेवटच्या माणसापर्यंत जाईल. नुसत्या विकासाच्या गप्पा मारून ते होणार नाही, हे राज्यकर्ते लक्षात घेतील तो सुदिन!

ही समृद्धी सर्वदूर कधी जाणार?


हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन नुकतेच पंतप्रधानांच्या हस्ते पार पडले. दुसऱ्या टप्प्याचे कामही वेगाने सुरू होऊन पुढील वर्षात मुंबई ते नागपूर असा प्रवास या मार्गावरून करणे शक्य होईल. आत्तापर्यंत रस्त्याने हा प्रवास करताना लागणारा वेळ जवळपास निम्म्यावर येऊ शकतो. तो तसा झाला तर दहा जिल्ह्यांना त्याचा थेट फायदा होईल. अप्रत्यक्ष फायदा आणखी काही जिल्ह्यांना होईल व एकूणच मराठवाडा, वऱ्हाड आणि विदर्भ या तीन भूप्रदेशांचे मुंबईशी व उत्तर महाराष्ट्राशी असलेले नाते अधिक दृढ होईल.

अमेरिकेतील रस्ते चांगले आहेत; म्हणून अमेरिका समृद्ध आहे असे सांगितले जाते. एकेकाळी महाराष्ट्रातही ही परिस्थिती होती. पण काळाच्या ओघात आपण ही गोष्ट विसरलो. राज्यकर्त्यांनी सोईस्करपणे दुर्लक्ष केले. रस्ते तयार करणे ही सरकारची जबाबदारी आहे, या मूळ तत्त्वाकडेच दुर्लक्ष झाले. त्यातून टोलसारख्या संकल्पनेचा जन्म झाला. सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्याने रस्ते खासगी कंत्राटदाराकडून बांधून घ्यायचे. कंत्राटदाराने त्या मोबदल्यात ठिकठिकाणी टोल वसूल करून गुंतवणूक व्याजासह वसूल करायची, अशी संकल्पना पुढे आली. प्रारंभी या टोलची रक्कमही फारशी नव्हती. रस्ता चांगला आहे, वेळेची व इंधनाची बचत होते आहे; मग टोल द्यायला काय हरकत आहे, असे सोयीचे समीकरण मांडले गेले. नागरिकांनीही ते मान्य केले. पण पुढे या रस्त्याची देखभाल, त्यावरील सुविधांकडे दुर्लक्ष पण टोल मात्र दर वर्षी महागाईप्रमाणे वाढणारा, या सूत्राने काम सुरू झाले. रस्त्यांची दुर्दशा तर झालीच, पण टोलचा भुर्दंडही असह्य होऊ लागला. काही रस्त्यांवर जितक्या किलोमीटरचा प्रवास तितक्या रुपयांचा टोल, तर पुणे-मुंबई सारख्या रस्त्यांवर किलोमीटरच्या दुप्पट रकमेचा टोल आकारण्यास प्रारंभ झाला. मग आंदोलने झाली. काही टोल बंद झाले, काही ठिकाणी मुदत संपल्यावरही टोलवसुली चालू राहिली. कारवाई कोणावरच झाली नाही, पण आंदोलने थांबण्यासाठी काही ठिकाणचे टोल बंद करून मलमपट्टी करण्यात आली. साहजिकच टोल बंद झाल्यानंतर त्या रस्त्यांना वाली राहिला नाही. रस्त्यांची पुन्हा दुरवस्था झाली. ते नव्याने करण्यासाठी सरकारकडे निधी नाही व पुन्हा टोल लावण्याची हिंमत नाही, अशा कात्रीत सरकार सापडल्याने अखेर रस्ते आहेत तसेच राहू देत, हा मध्यममार्ग शोधला गेला. आज महाराष्ट्रातील बहुतेक राज्य महामार्ग या स्थितीत आहेत. समृद्धी महामार्गाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने हा इतिहास पुन्हा आठवला. कारण मुंबई ते नागपूर या जुन्या रस्त्यावरून जाऊन बघा. अनेक ठिकाणी हा रस्ता उखडलेला आहे. त्यावर कधीकाळी डांबर टाकले होते, यावर विश्वास बसू नये अशी स्थिती आहे. अगदी औरंगाबादच्या बाहेरून जाणारा बायपास बघितला तरी याची कल्पना येईल. हे असे का होते, हा खरे तर चिंतनाचा व कृतीचा विषय आहे. 'पुणे-मुंबई एक्स्प्रेस वे' हा या पद्धतीने बांधला गेलेला महाराष्ट्रातील पहिला मोठा रस्ता. त्यापूर्वी चार लेनचे काही रस्ते राज्यात होते. पण त्यावर मध्ये दुभाजक नसायचा, बाकी सुविधा नसायच्या. शेजारच्या गावातील नागरिकांसाठी पर्यायी रस्ते नसायचे, हे महामार्ग ओलांडून जाण्याशिवाय त्यांना पर्याय नसायचा. 'एक्स्प्रेस वे'ने हे चित्र बदलले. वर्दळीचा महामार्ग बांधताना शेजारच्या गावातील लोकांचाही विचार व्हायला हवा, त्यांच्यासाठी सर्व्हिस रोड हवेत, रस्ते ओलांडण्यासाठी मुख्य चौकांत अंडरपास किंवा उड्डाणपूल हवेत, हे सगळे या एक्स्प्रेस वेने दाखविले. पण त्यानंतर महाराष्ट्रात अशा पद्धतीचा रस्ता बांधण्यासाठी तब्बल २५ वर्षे जावी लागली. महाराष्ट्रासारख्या प्रगत, आर्थिक दृष्ट्या आघाडीवर असलेल्या राज्यात अशी स्थिती का आली, याचा विचार राज्यकर्ते कधी करणार की नाही? या काळात सर्व प्रमुख पक्ष सत्तेत येऊन गेले.

# मुंबईतही वातावरणाचा 'तमिळनाडू पॅटर्न' हवा...

**महाराष्ट्रालाही तमिळनाडूप्रमाणेच मोठी किनारपट्टी लाभली असल्यामुळे तेथील 'वातावरण बदल अभियान' इथेही राबविण्याच्या दृष्टीने पावले उचलली जाण्याची गरज व्यक्त होत आहे.**

वातावरण बदल ही आता अस्तित्वाची लढाई झाली आहे. गेल्या वर्षी जाहीर झालेल्या इंटरगव्हर्न्मेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंजच्या (आयपीसीसी) सहाव्या मूल्यांकन अहवालातून अनेक चिंताजनक निष्कर्ष समोर आले आहेत. 'मानवासाठी ही धोक्याची घंटा आहे. आता हालचाल केली नाही तर नंतर काही करण्यात अर्थ नाही,' असे संयुक्त राष्ट्र संघाच्या अहवालात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर तमिळनाडू सरकारने वातावरणीय बदलांसंदर्भात गंभीर पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. हे अभियान महाराष्ट्रातही राबवण्याच्या दृष्टीने सरकारी स्तरावर विचार केला जावा, अशी पर्यावरणप्रेमींची मागणी आहे. 'तमिळनाडू वातावरण बदल अभियाना'ची सुरुवात नुकतीच तमिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आली. वातावरण बदलाच्या संकटाचा सामना करण्यासाठी 'तमिळनाडू ग्रीन क्लायमेट कंपनी' (टीएनजीसीसी) आणि मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या अध्यक्षतेखाली 'तमिळनाडू गव्हर्निंग



काऊन्सिल ऑन क्लायमेट चेंज'ची स्थापना यांसारख्या अनेक उपक्रमांची सुरुवात या वेळी करण्यात आली. वातावरण बदलाबाबत ग्रीन क्लायमेट कंपनीसारखे पाऊल उचलणारे तमिळनाडू हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. गव्हर्निंग काऊन्सिलमध्ये शासकीय प्रतिनिधींबरोबरच अशासकीय सदस्यांचा, तज्ज्ञांचा समावेशदेखील आहे.

तमिळनाडू सरकारने २०२१ मध्ये राज्याच्या पर्यावरण खात्याचे नाव 'पर्यावरण आणि वातावरण बदल' असे करून त्यादृष्टीने कामाला सुरुवात केली. 'तमिळनाडू हरित अभियान', 'तमिळनाडू पाणथळ जागा अभियान' आणि 'तमिळनाडू वातावरण बदल अभियान' अशा तीन अभियानांची घोषणा केली. त्यापैकी दोन अभियाने यापूर्वीच सुरू झाली असून, वातावरण बदल अभियानास गेल्या आठवड्यात प्रारंभ झाला. त्या वेळी 'वातावरण बदलांवर काम करणे ही केवळ ऐतिहासिक जबाबदारी नसून, माझी आयुष्यभराची जबाबदारी आहे,' अशा शब्दांत तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी याप्रश्नी कटिबद्धता दर्शवली. तमिळनाडू हरित अभियानाद्वारे राज्याचे वन आच्छादन ३३ टक्क्यांनी वाढवायचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. ज्यामुळे वातावरणातील कार्बन शोषून घेणे आणि कार्बन न्यूट्रॅलिटच्या दिशेने वाटचाल करण्यास मदत होईल. पाणथळ जागादेखील कार्बन शोषून घेण्याचे काम करतात. त्यामुळे रामसर दर्जा मिळवण्याच्या प्रक्रियेतून त्यांचे संरक्षण करण्यात येत आहे. तमिळनाडू हे देशात सर्वाधिक १३ पाणथळ जागांना रामसर दर्जा मिळवणारे राज्य आहे. तमिळनाडूतील सर्व प्रकल्प वातावरणीय दृष्टिकोनातून पाहिले जावेत, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. सर्व विभागांमध्ये वातावरणीय दृष्टीने अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरेंनी भाजपच्या पाठीत खंजीर खुपसला!

## भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांचा आरोप

। चंद्रपूर। महाईन्यूज ।

शौर्य व विरतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचे सुपुत्र उद्धव ठाकरे यांनी केवळ मुख्यमंत्री पदाच्या लालसेपोटी भारतीय जनता पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसला, असा आरोप भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघात यश मिळावे यासाठी नड्डा यांनी न्यू इंग्लिश हायस्कूलच्या क्रीडांगणावर 'विजय संकल्प' जाहीर सभेच्या माध्यमातून प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी ते बोलत होते.मंचावर वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यपालन मंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, खासदार अशोक नेते, खा. रामदास तडस, आमदार संजीव रेड्डी, आ.डॉ. रामदास आंबटकर व आ. बंटी भांगडिया, ग्रामीण जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगर अध्यक्ष डॉ.मंगेश गुलवाडे उपस्थित होते.



नड्डा म्हणाले, महाविकास आघाडीच्या माध्यमातून उद्धव सेना, काँग्रेस व राष्ट्रवादी अशी भ्रष्टाचाराची तीन दुकाने उघडली. सत्तेसाठी विचारांशी तडजोड करणाऱ्या अशा लोकांना माफी नाही. राजकारणात सत्याचा नेहमीच विजय होतो. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस समोर माथा टेकता टेकता ठाकरे यांचा माथाच झुकला आहे. भाजपने जनाधार, जनधन, आधार व मोबाईल असा एकत्रित जॅम केला. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने मात्र ज्वाईन्टली एक्वायर मनी अशा पध्दतीने केवळ पैसा ओरबाडण्याचे काम केले. याच भ्रष्टाचारामुळे राज्यातील दोन मंत्री कारागृहात गेले. त्यातील एक माजी मंत्री नुकतेच कारागृहातून सुटून बाहेर आले तर एक कारागृहात अजूनही शिक्षा भोगत आहेत.

काँग्रेसच्या काळात मेंदूज्वर, पोलिओ, जापनीज ताप यावर भारतात दोन करोना लसींची निर्मिती केली. कधीकाळी मोबाईल आयात करावे लागत होते. आज ९७ टक्के मोबाईलचे उत्पादन भारतात होते.

### मोदींनी युक्रेन युध्द थांबविले

**युक्रेन युध्द सुरू असताना पंतप्रधान मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी बोलून युक्रेन युध्द थांबविले होते. त्यानंतर भारतातील ३२ हजार विद्यार्थ्यांना युध्द भूमितून भारतात आणले. जोवर विद्यार्थी भारतात परतले नाही तोवर युध्द थांबवून ठेवले. अमेरिका, ब्रिटेन, पाकिस्तान यांनाही जे करता आले नाही ते मोदींनी केल्याचे नड्डा म्हणाले.**

# निवासी डॉक्टरांनी संप मागे घ्यावा

## सरकारला 15 दिवसांचा वेळ द्यावा- गिरीश महाजन

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यभरातले निवासी डॉक्टर संपावर गेले आहेत. त्यामुळे रूग्णांचे हाल होतं आहेत. अशात गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषद घेत संप मागे घेण्याचं आवाहन निवासी डॉक्टरांना केलं आहे. आम्हाला निवासी डॉक्टरांना भेडसावणाऱ्या समस्या माहित आहेत. निवासी डॉक्टरांनी आम्हाला १५ दिवसांचा अवधी द्यावा. उगाच संप करायचा म्हणून संप करू नका असं आवाहनही गिरीश महाजन यांनी केलं आहे. राज्यातल्या निवासी डॉक्टरांनी विविध मागण्यासाठी आजपासून संप पुकारला आहे. अतिदक्षता विभाग वगळता सर्व विभागांच्या सेवा बंद ठेवण्याचा इशारा मार्डने दिला. त्याच पार्श्वभूमीवर गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषद घेत निवासी डॉक्टरांना संप मागे घेण्याचं आवाहन केलं आहे.

निवासी डॉक्टरांचे अनेक प्रश्न आपण मार्ग लावली आहे. तसंच त्यांची



जी एरिअर्सची मागणी आहे ती देखील आम्ही वित्तविभागाकडे दिली आहे. त्याचा पाठपुरावा सुरू आहे. आम्ही निवासी डॉक्टरांना हेदेखील सांगितलं की १५ दिवसात हा प्रश्न मार्गी लागेल. आम्ही सकारात्मक आहोत. सरकार सकारात्मक आहे अशात निवासी डॉक्टरांनी अशा प्रकारे संप पुकारणं योग्य नाही असं गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे.आम्ही सगळेच निवासी डॉक्टरांच्या अडचणी जाणून आहोत. मी या प्रयत्नात असतो की संपाची वेळ येऊ नये. सरकार तुमच्याशी चर्चाच करत नसतं तर संपाची भूमिका योग्य आहे. मात्र तसं काहीही घडलेलं नाही असंही गिरीश महाजन यांनी स्पष्ट केलं. आम्ही १४३२ लोकांच्या जागा भरण्यासाठी १५ दिवसांचा अवधी मागितला आहे.

### मार्डच्या प्रमुख मागण्या काय आहेत?

- रिक्त पदं भरण्याची मागणी प्रामुख्याने मार्डकडून करण्यात आली आहे
- २०१८ पासूनचे थकीत रक्कम देण्याची मागणी केली गेली आहे
- मेडिकल कॉलेजमध्ये असोसिएट आणि असिस्टंट प्रोफेसर या जागाही भरल्या गेलेल्या नाहीत त्या भरल्या जाव्यात अशीही मागणी केली गेली आहे



जगात सहा जातीचे फ्लेमिंगो असले तरी नवी मुंबईच्या खाडीमध्ये सध्या लेसर आणि ग्रेटर असे दोन जातीचे फ्लेमिंगो पहायला मिळत आहेत.

ऐरोलीमध्ये वनविभागाने सुरू केलेली फ्लेमिंगो सफारी रोज फूल जावू लागली आहे.

# नवीन वर्ष, मोठी आव्हाने..!


**।पुणे । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

नवीन वर्षाची प्रतीक्षा संपली. आणि या वर्षी काहीतरी चांगले आणि अद्वितीय, अद्भुत घडेल अशी आशा आहे. केवळ वैयक्तिक जीवनातच नाही तर राष्ट्राच्या विकासातही. त्यासाठी विचारांच्या पातळीवर आणि कार्यशैलीच्या पातळीवरही बदल घडवून आणावा लागेल. हा बदल केवळ झाला पाहिजे असे नाही, तर प्रत्येक स्तरावर दिसायला हवा.कारण तरच देशासमोरील समस्यांवर मात करता येईल. आज संपूर्ण जग नव्या वर्षाचे स्वागत नव्या जोशात आणि उत्साहाने करत आहे. आपण सर्वजण नवीन संकल्प घेऊन नवीन वर्षात प्रवेश केलेला असणारच. नवीन वर्षात देशापुढील आव्हाने कमी नाहीत. या आव्हानांना तोंड देण्यासाठी दृढ संकल्प आणि प्रबळ इच्छाशक्तीची गरज आहे. महागाई, बेरोजगारी यांसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सरकारला 2023 मध्ये देशासमोर रोडमॅप मांडावा लागणार असताना, कोरोनासारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी समाजाला लोकसहभागातून एकजुटीने पुढे यावे लागेल. नवीन वर्षात मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागणार आहेच. या आव्हांनाचा महाईन्यूजने घेतेलेला वेध... खास आमच्या वाचकांसाठी...

## महागाई नियंत्रणात आणणे मोठे आव्हान?

नवीन वर्षात महागाईच्या आव्हानाला तोंड देणे हे सरकारसह सर्वसामान्यांसमोर मोठे आव्हान आहे. नवीन वर्षात सरकारचे पहिले प्राधान्य महागाईला तोंड देण्याचे असेल. 2023 मध्ये खाद्यपदार्थांच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवणे आणि देशाचा आर्थिक विकास दर वाढवणे हे सरकारसमोर मोठे आव्हान आहे. मागील 2022ची परिस्थिती पाहिली तर या दोन्ही आव्हानांना तोंड देणे सरकारसाठी सोपे जाणार नाही. 2022 मध्ये विक्रमी महागाईने जनता हैराण झाली असून नव्या वर्षात सरकारकडे मोठ्या आशेने पाहत आहे.

भारतात रिझर्व्ह बँकेने चलनवाढीचा दर ६ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. सरकारच्या सर्व प्रयत्नांनंतरही महागाई थांबण्याचे नाव घेत नाही. महागाईला ब्रेक न लागल्याने पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची शक्यता वाढू लागली आहे. याआधी रिझर्व्ह बँकेने व्याजदरात वाढ करून महागाई नियंत्रणासाठी जे काही प्रयत्न केले, ते आतापर्यंत अयशस्वी ठरले आहेत. महागाईसह आर्थिक विकास दर राखणे हे सरकारसमोर मोठे आव्हान आहे. 2023 मध्ये आर्थिक विकासाला गती देण्यासाठी सामान्य अर्थसंकल्पात काही मोठी पावले उचलण्याचा दबाव सरकारवर दिवसेंदिवस वाढत आहे. महागाई नियंत्रणात आणण्यासाठी आरबीआयला आगामी काळात काही मोठी पावले उचलावी लागतील. तर सरकारला अर्थसंकल्पातही काही मोठ्या घोषणा कराव्या लागतील. अर्थमंत्र्यांना अर्थसंकल्पात अशा क्षेत्रांमध्ये (बांधकाम, रिअल इस्टेट, उत्पादन) निधी वाढवावा लागेल ज्यामध्ये वाढ आणि खरेदीची अधिक क्षमता आहे.




## बेरोजगारीवर मात करण्याचे आव्हान

2023 मध्ये बेरोजगारीच्या आव्हानाला तोंड देणे हे सरकारसाठी मोठे आव्हान असेल. एकीकडे देशात तरुण बेरोजगारांची संख्या वाढत आहे, तर रोजगाराच्या संधी कमी होत असताना, डिसेंबर महिन्यात देशातील बेरोजगारीचा दर आतापर्यंतच्या उच्चांकावर पोहोचला आहे. डिसेंबरच्या पहिल्या तीन आठवड्यात, कामगार शक्तीच्या संबंधात बेरोजगारीचा दर 8% पेक्षा जास्त आहे. भारतातील बेरोजगारीची वाढती आकडेवारी भयावह आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या आकडेवारीनुसार, बेरोजगारी हा सरकारसाठी चिंतेचा विषय आहे, त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारचे संपूर्ण लक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर आहे. केंद्र व राज्य शासन रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना खाजगी क्षेत्रात रोजगार उपलब्ध करून देत आहे. मध्यप्रदेश या निवडणूक राज्यात दर महिन्याला जिल्हा स्तरावर रोजगार मेळावे आयोजित करून खाजगी क्षेत्रात तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला जात आहे.

## देशाच्या उन्नतीसाठी नियमांचे पालन व्हावे...

नवीन वर्षाचे पहिले चार-पाच महिने आव्हानात्मक असतील, असे काही आर्थिक तज्ज्ञांचे मत आहे, परंतु सरकारचा सर्वसाधारण अर्थसंकल्प विकासाभिमुख असेल आणि त्यात लोकसंख्येची धोरणे भरलेली नसतील, तर आव्हानांना तोंड देता येईल, परंतु हे तेव्हाच घडेल जेव्हा उद्योग जगाला त्याची मेहनत दाखवायला हवी. जगात मंदीचे वातावरण असतानाही भारत स्वबळावर आर्थिक विकासाला पुढे खेचू शकतो. ज्याप्रमाणे उद्योग-व्यवसाय जगताकडून आर्थिक विकासासाठी समर्पित राहावे, अशी अपेक्षा आहे, त्याचप्रमाणे देशाच्या उन्नतीसाठी कटिबद्ध राहून नियमांचे पालन करण्याची निष्ठा बाळगावी, अशी जनतेकडून अपेक्षा आहे. नियम सामान्य जनतेचे समर्पण आणि शिस्त हेच देशाला आव्हानांचा सामना करण्यास सक्षम करते.

## नऊ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका

देशाचे अंतर्गत वातावरण सुरळीत ठेवण्यात राजकारणाचा मोठा वाटा आहे. या वर्षी नऊ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार असल्याने वर्षभर राजकीय उलथापालथ सुरू राहणार असून, पक्ष आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडणार आहेत. पुढील वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकांमुळे केंद्र सरकारही या वर्षाच्या अखेरीस निवडणूक मोडमध्ये येणार आहे. निवडणुकीच्या वातावरणात राजकीय पक्ष कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीचा फायदा घेऊन समाजाची फसवणूक करण्याच्या तयारीत असतात. अशा स्थितीत विवेक दाखवण्याबरोबरच समाज आणि राष्ट्राप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून द्यावी, ही देशातील जनतेकडून अपेक्षा आहे. समाजात एकोपा राखण्यासाठी सर्वसामान्यांनाही काळजी करावी लागणार आहे.

## आता तरी व्हा कोविडपासून सावधान!

कोविड महामारीने पुन्हा डोकेवर काढण्याची शक्यता असताना नवीन वर्षाचे आगमन होत असल्याने सतर्क राहण्याची गरज आहे. चीन कोविड महामारी नियंत्रणात असल्याचे सांगत असले आणि पाश्चात्य देशांच्या वृत्तसंस्थांचे दावे फेटाळत असले तरी त्यावर विश्वास ठेवता येत नाही. यासाठी भारतालाही काळजी घ्यावी लागेल. आणि देशातील जनतेनेही. लसीकरण मोहिमेच्या यशामुळे भारतात संकरित प्रतिकारशक्ती निर्माण झाल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कोविडच्या चौथ्या लाटेचा देशावर दीड वर्षापूर्वी दुसऱ्या लाटेसारखा परिणाम होणार नाही, अशी आशा बाळगायला हवी. लोकांना कोविडपासून सावध राहावे लागेल तसेच शिस्तप्रिय नागरिक या नात्याने त्यांच्या जबाबदाऱ्यांचा भाग योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी सज्ज व्हावे.जर भारतीय समर्पित आणि शिस्तप्रिय असते.




# अण्णा भाऊ साठे यांच्या लेखणीतून साकारलेला " सुलतान " लवकरच

पुणे : ब्लॅक हॉर्स मोशन पिक्चर्स प्रथमच चित्रपट निर्मिती मध्ये पदार्पण करत असून पदार्पणातच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कथेवर आधारीत सुलतान या मराठी लघुपटाची नुकतीच घोषणा केली .

काल नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी दिनांक १ जानेवारी २०२३ राजी या लघुपटाचे पोस्टर आणि टायटल सोशल मीडियावर प्रदर्शित केले आहे. यामध्ये सुलतानच्या प्रमुख भूमिकेत अभिनेता अनिल नगरकर असून अनिल नगरकर प्रथमच एका वेगळ्या धाटणीची भूमिका साकारत आहेत, याशिवाय नाळ , घर बंदुक बिर्याणी या चित्रपटात भूमिका केलेले अभिनेते गणेश देशमुख तसेच कस्तुरी,म्होरक्या , वाय या चित्रपटात भूमिका केलेले अभिनेते अनिल कांबळे आणि अजय साठे ,प्रशांत रुईकर, श्रीकांत गायकवाड , तानाजी साठे , एकनाथ गालफाडे ,रणजित सराटे आदी अभिनय करत आहेत. तसेच छायाचित्रण अभिजीत घुले तर संकलन प्रदीप पाटोळे हे करत आहेत.

सुलतान या लघुचित्रपटाचं दिग्दर्शन अविनाश कांबीकर करत असून त्यांनी यापूर्वी विविध व्यवसायिक जाहिरातीचे दिग्दर्शन केलेले आहे. सुलतान या लघुपटाच्या माध्यमातून ते प्रथमच एका ऐतिहासिक विषयावर लघुपटाचे दिग्दर्शन करत आहेत. अण्णा भाऊ साठे यांची सुलतान हि कथा भारतासह रशियात प्रचंड गाजलेली आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रखर लेखणीतून साकारलेलं सामान्य माणसाचं जगण्याच मुल्य या लघुचित्रपटाच्या माध्यमातून मांडण्याचा मी प्रयत्न केला असून ह्यावर काम करताना प्रचंड दबाव होता. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची नुकतीच जन्मशताब्दी साजरी झाली असून त्यांनाही या माध्यमातून आदरांजली वाहण्याची मला संधी मिळाली या बद्दल मी ब्लॅक हॉर्स मोशन पिक्चर्स आणि सहनिर्माते विजय क्षिरसागर यांचा खूप आभारी आहे असे दिग्दर्शक अविनाश कांबीकर म्हणाले.

नुकतंच सुलतान या लघुचित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आलं, यामध्ये अभिनेते अनिल नगरकर यांची भेदक नजर आणि पोस्टरवरील ह्या ओळी " विद्रोह आणि बंडाच्या मार्गावर वाटचाल केल्याशिवाय क्रांती होत नाही...! " प्रेक्षकांना चांगल्याच पसंत पडत आहेत

# तेजस्विनी पंडितला झालयं तरी काय?



मराठी मनोरंजन विश्वातील अतिशय लोकप्रिय अभिनेत्री आणि त्याचबरोबर निर्माती म्हणून तेजस्विनी पंडीत ओळखली जाते.तिने तिच्या अभिनय आणि सौंदर्याच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. आपल्या दर्जेदार अभिनयाने तिने यशाची उंची गाठली आहे.

एक सोज्वळ भूमिकेचं पात्र असो किंवा 'रानबाजार' सारख्या सिरिजमधील तिचा बोल्ड अवतार. तिने सागळ्याच भूमिका चोख निभावल्या आहेत. ती सोशल मिडियावर बरीच सक्रिय असते.

नवीन वर्षाच्या तिने चाहत्यांना वेगळ्याचं पद्धतीने शुभेच्छा दिल्या आहेत. तिने शेअर केलेल्या एका पोस्टनं पुन्हा नेटकऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिने नवीन वर्षाच्या शुभेच्छा देतांना एक मोलाचा सल्ला दिला आहे.

कलाकारांना त्याच्या चाहत्यांच्या संपर्कात राहण्यासाठी सोशल मिडियावर नेहमीच सक्रिय असावे लागते. चाहतेही आपल्या आवडत्या कलाकारांच्या वैयत्किक आयूष्याबद्दल जाणून घेण्यासाठी उत्सूक असतात. त्याचे फोटो आणि व्हिडिओ पाहिल्यानंतर चाहते खूश होतात आणि त्या पोस्टवर लाइक्स अन् कमेंटचा वर्षाव करतात.

# तुझ्यापेक्षाही तुझी मुलगी भारी!



**बॉलीवूडमध्ये करिश्मा कपूरनं दीड दशक चाहत्यांच्या मनावर अधिराज्य केलं. तिचा डान्स, अभिनय आणि तिचं सौंदर्य यावर चाहते फिदा होते. ९० च्या दशकामध्ये करिश्मानं वेगळी ओळख निर्माण केली होती. आता ती तिच्या लेकीमुळे चर्चेत आली आहे.**

करिश्मा भलेही तिच्या ॲक्टिंगमुळे प्रेक्षकांच्या कौतूकाचा विषय असेल मात्र बऱ्याचदा ती तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकांच्या गप्पांचा विषय होती. बॉलीवूडमधील रागीट आणि परखड व्यक्तिमत्वाची अभिनेत्री म्हणून करिश्माकडे पाहिलं गेलं. दरम्यानच्या काळात करिश्मानं मोठ्या पडद्यापासून ब्रेक घेतला होता. फोटोग्राफर्सला करिश्माच्या फॅमिली फोटो मिळाला आणि पुन्हा एका चर्चेला सुरुवात झाली आहे. करिश्मा कपूर आणि तिची मुलगी समायरा कपूर, मुलगा कियान कपूर यांचे फोटो इंस्टावर व्हायरल झाले असून त्यावर नेटकऱ्यांनी वेगवेगळ्या कमेंटस् करायला सुरुवात केली आहे. त्यापैकी एकानं तर करिश्माला थेट तिच्या मुलीवरुन प्रतिक्रिया दिली असून त्यामध्ये करिश्मा तुझ्यापेक्षाही समायरा सुंदर आहे. अशा शब्दांत तिचं कौतूक केलं आहे.



## श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेआधी ऋषभ पंतसाठी

# हार्दिक पांड्या झाला भावनिक

### "तो संघाचा महत्त्वाचा भाग होता पण आता..."

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

श्रीलंकेविरुद्धच्या तीन टी२० सामन्यांच्या मालिकेपूर्वी हार्दिक पांड्या म्हणाला की, टीम इंडियाचे लक्ष्य यंदाचा विश्वचषक जिंकण्याचे आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यातील पहिला टी२० सामना मंगळवारी (३ जानेवारी) मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत हार्दिक म्हणाला की, "टीम इंडिया विश्वचषकावर लक्ष केंद्रित करत आहे." यासोबतच त्याने ऋषभ पंतच्या अपघातावरही आपले मत मांडले. पांड्या म्हणाला की, "संपूर्ण संघ पंतच्या पाठीशी उभा आहे."

ऋषभ पंतच्या अनुपस्थितीमुळे भारतीय संघाच्या संतुलनावर नक्कीच मोठा परिणाम होईल पण टी२० फॉर्मेटमध्ये भारताचा नवा कर्णधार हार्दिक पंड्या सध्या त्याच्या सहकाऱ्याला लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा देत आहे. शुक्रवारी पहाटे दिल्ली-डेहराडून महामार्गावरील रस्त्याच्या दुभाजकाला धडकल्यानंतर त्यांच्या आलिशान कारला आग लागल्याने पंत थोडक्यात बचावले. आईला 'सरप्राईज' देण्यासाठी तो रुरकीला जात होता. प्रकृतीत सुधारणा झाल्याने त्यांना मॅक्स हॉस्पिटलच्या आयसीयूमधून खासगी वॉर्डात हलवण्यात आले आहे.आमच्या प्रार्थना ऋषभ पंतसोबत आहेत: पत्रकार परिषदेच्या सुरुवातीलाच हार्दिकने ऋषभ पंतशी संबंधित प्रश्नाचे उत्तर दिले. तो म्हणाला, "ऋषभ पंतला जे घडले ते दुर्दैवी होते. आमचे प्रेम, आमच्या प्रार्थना त्याच्या पाठीशी आहेत. तो संघासाठी महत्त्वाचा खेळाडू आहे. आम्हाला पुढील मूल्यमापन करणे आवश्यक आहे. त्याच्या अनुपस्थितीत इतरांना संधी मिळेल. संघातील त्याच्या अनुपस्थितीने मोठा फरक पडेल."

उत्तराखंडमधील रुरकीजवळ शुक्रवारी (३० डिसेंबर) पंत यांच्या कारला अपघात झाला. यामध्ये त्यांचा जीव वाचला. पंतच्या गुडघ्यात फ्रॅक्चर झाले आहे. त्याच्या कपाळावर टाके पडले आहेत. हाताला आणि पाठीलाही दुखापत झाली आहे. या अपघातानंतर तो बराच काळ व्यावसायिक क्रिकेटपासून दूर राहू शकतो. पंतला पूर्णपणे बरे होण्यासाठी किमान सहा महिने लागतील, असे मानले जात आहे.

#### हार्दिक कसोटीत पुनरागमन करू शकतो

कसोटीत परतल्यावर हार्दिक म्हणाला, "आता मला मर्यादित षटकांमध्ये पूर्णपणे खेळू द्या. त्यानंतर मी कसोटी क्रिकेटचा विचार करेन.हार्दिकच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते की, त्याने कसोटी क्रिकेट पूर्णपणे सोडलेले नाही आणि भविष्यात तो सर्वात लांब फॉरमॅटमध्ये खेळताना दिसणार आहे."

#### '2024 टी20 विश्वचषक जिंकण्याचे ध्येय'

**हार्दिकला विश्वचषकाशी संबंधित प्रश्नही विचारण्यात आला होता. टीम इंडियाने नव्या वर्षात विश्वचषक जिंकण्याचा संकल्प केला आहे. हार्दिक म्हणाला, "आमचा उद्देश आपल्या देशासाठी विश्वचषक जिंकणे आहे. दुर्दैवाने, आम्ही २०२२ मध्ये ते करू शकलो नाही, परंतु आम्हाला या वर्षी ते अधिक चांगले करायचे आहे."**

#### 'व्यक्तिगत 2022 माझे सर्वोत्तम वर्ष'

**हार्दिक पांड्या त्याच्या गोलंदाजीवर म्हणाला, "मला एकच भाषा येते, ती म्हणजे मेहनत. दुखापत माझ्या हातात नाही, पण माझा या प्रक्रियेवर विश्वास आहे. २०२२ हे वैयक्तिकरित्या माझे सर्वोत्तम वर्ष होते. आम्ही विश्वचषक जिंकलो नाही, पण हा खेळाचा भाग आहे. संघाला अनेक देशांतील स्पर्धा जिंकण्यास मदत करणे हा माझा उद्देश आहे."**

# वर्ल्डकप 2023 साठी भारतीय हॉकी संघाची घोषणा

## भारतीय संघाचे नेतृत्व ड्रॅगफ्लिकर हरमनप्रीत कर्णधार

ओडिसा । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ओडिसामध्ये होणाऱ्या पुरूष हॉकी वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय हॉकी संघ येत्या 13 जानेवारीपासून आपली मोहीम सुरू करणार आहे. ग्रुप D मध्ये भारताबरोबरच इंग्लंड, स्पेन आणि वेल्स या संघाचा देखील समावेश आहे. दरम्यान, वर्ल्डकपसाठीच्या भारतीय संघाची घोषणा आज करण्यात आली. यात 18 खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

भारतीय संघाचे नेतृत्व ड्रॅगफ्लिकर हरमनप्रीत सिंह करणार आहे तर



अमित रोहिदास हा संघाचा उपकर्णधार असेल. SAI सेंटर बंगळुरू येथील दोन दिवसीय निवड चाचणी शिबीरानंतर संघाची घोषणा करण्यात आली आहे. या चाचणीत 33 खेळाडूंना आजमावून पाहण्यात आले. यानंतर अनुभवी आणि युवा खेळाडूंचा चांगला समतोल साधत 18 जणांचा अंतिम संघ निवडण्यात आला.

भारत 13 जानेवारीला राऊरकेलामध्ये स्पेनविरूद्ध खेळत आपली मोहीम सुरू करणार आहे. त्यानंतर भारतीय संघ आपला दुसरा सामना इंग्लंडविरूद्ध खेळेल. त्यानंतर भारतीय संघ वेल्सविरूद्धचा सामना खेळण्यासाठी भुवनेश्वरमध्ये पोहचेल. स्पर्धेची बाद फेरी 22 जानेवारी, क्रॉसओव्हर सामने 23 जानेवारी, तर 25 जानेवारीला क्वार्टर फायनल सामने होतील. 27 जानेवारीला सेमी फायनल आणि 29 जानेवारीला फायनल होणार आहे.भारतीय पुरुष हॉकी संघ

गोलकिपर :- कृष्णा बहादूर पाठक, श्रीजेश परट्ट रविंद्रन, बचाव फळी :- जरमनप्रीत सिंग, सुरेंद्र कुमार, हरमनप्रीत सिंग (कर्णधार), वरूण कुमार, अमित रोहिदास (उपकर्णधार), नीलम संजीप

मधली फळी :-मनप्रीत सिंग, हार्दिक सिंह, नीलकांत शर्मा, शमशेर सिंह, विवेक सागर प्रसाद.